|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**North Maharashtra University, Jalgaon**

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१

दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

'A' Grade

(NAAC Re-Accredited)

3rd Cycle

## Public Relations Office — जनसंपर्क विभाग

जळगाव १३ (          ) ह्दयापर्यंत पोहोचते ते संगीत आणि ते देण्यासाठी योग्य गुरु आणि चिंतन महत्वाचे आहे याकडे लक्ष दिल्यास संगीतात रस निर्माण होईल असा मौलिक सल्ला प्रसिध्द बासरीवादक पं.रुपक कुळकर्णी यांनी स्पिकमॅके अंतर्गत आज दिनांक १३ मार्च रोजी आयोजित बासरीवादन कार्यक्रमप्रसंगी दिला.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील स्पिकमॅके अंतर्गत प्रसिध्द बासरीवादक पं.रुपक कुळकर्णी यांच्या बासरी वादनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील होते. उद्‌घाटनप्रसंगी निशा कुळकर्णी, प्रा.रत्नाकर गोरे, प्रा.संजय पत्की आदी उपस्थित होते.

पं.रुपक कुळकर्णी यांनी अहिर भैरव हा राग सादर करुन उपस्थित स्त्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. तबल्यावर भानुपकाश बारोट यांनी साथ दिली. यासोबतच बासरीच्या सात छिद्रांमधून सप्तक स्वरुपात निघणाऱ्या स्वरांचे महत्व विषद करुन प्रेक्षकांना संगीत ज्या पध्दतीने पाहिजे आहे ते पोहोचविल्यास त्यालाच खरे संगीत म्हणतात असेही यावेळी ते म्हणाले. उपस्थित प्रेक्षकांच्या प्रश्नांची उत्तरे त्यांनी दिली.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार खेमराज पाटील यांनी मानले.

-----------------------------------------------------------------------------------------------

जा.क्र. उमवि/१६/हस्तदेय /२०१८          दि. १३ मार्च, २०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या तीनही जिल्हयाच्या आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत प्रत/-

जनसंपर्क अधिकारी यांचे करीता

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
**North Maharashtra University, Jalgaon**
**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**
पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१
दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

'A' Grade
(NAAC Re-Accredited)
3rd Cycle

## Public Relations Office जनसंपर्क विभाग

बातमी-२

जळगाव 13 ( ) सन २०१७-१८ या वर्षाचे राष्ट्रीय सेवा योजनेची राज्यस्तरीय उत्कर्ष सामाजिक सांस्कृतिक स्पर्धा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे नुकतीच संपन्न झाली. या स्पर्धेत उमविच्या रासेयो संघाने उत्कृष्ट कामगिरी करत तीन बक्षिसे मिळविली यात फोटोग्राफी स्पर्धेत उमवि राज्यात अव्वल ठरले. स्पर्धेसाठी एकूण १९ विद्यार्थ्यांचा संघ सहभागी झाला होता.

यात शुभम तायडे जे.डी.एम.व्ही.पी.एस.चे महाविद्यालय यावल, यास फोटोग्राफी स्पर्धेत प्रथम तर ,भित्तीपत्रिक स्पर्धेत प्रज्ञा दुग्गल, मु.जे.महाविद्यालय जळगाव हिस द्वितीय क्रमांकाचे बक्षिस मिळाले. उत्कृष्ट फोटोग्राफी या प्रकारात उमवि हे राज्यात अव्वल ठरले असुन उमविस फिरता चषक प्राप्त झाला आहे. या स्पर्धेसाठी भैया फकीर (प्रताप महाविद्यालय, अमळनेर), राहुल निकुंभ व विशाल धनगर (महात्मा गांधी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय. चोपडा), शुभम तायडे (कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय. यावल), गणेश पाटील (डॉ.पी.आर घोगरे विज्ञान महाविद्यालय, धुळे), धनराज पाटील (कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयख सोनगिर) प्रविण धनगर(एस.पी.डी.एम.महाविद्यालय. शिरपूर), लिलाधर माळी(जी.टी.पी. महाविद्यालय. नंदुरबार), राहुल पाटील(पी.एस.जी.व्ही.पी.एस.चे महाविद्यालय, शहादा), स्नेहा बारेला व कांचन चव्हाण (सामाजिकशास्त्र प्रशाळा उमवि, जळगाव), कोमल बोरनारे(पी.के.कोटेचा महिला महाविद्यालय, भुसावळ), प्रज्ञा दुग्गल (मु.जे. महाविद्यालय जळगाव), अस्मिता पगारे(समाजकार्य महाविद्यालय, मोराणे), दामिनी शर्मा (एम.डी.पालेशा वाणिज्य महाविद्यालय धुळे), धनश्री पाटील(एस.एस.व्ही.पी.एस.चे कला व वाणिज्य महाविद्यालय, धुळे), रिया रोकडे(एस.टी.कॉप.चे महाविद्यालय, शहादा), दामिनी फडे(पी.एस.जी.व्ही.पी.एस.चे महाविद्यालय, शहादा) या विद्यार्थ्यांचा समावेश होता. संघव्यवस्थापक म्हणुन डॉ.दयाधन राणे, डी.एन भोळे महाविद्यालय,भुसावळ हे होते.

या यशाबद्दल उमविचे कुलगुरू प्रा.पी.पी.पाटील, प्र.कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर, कुलसचिव बी.बी.पाटील व विद्यार्थी विकास व रासेयो विभागाचे प्र. संचालक प्रा.एस.टी.इंगळे, तसेच व्य.प.सदस्य दिलीप रामु पाटील व दिपक बंडु पाटील व संबधित सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी अभिनंदन केले आहे.

---

जा.क्र. उमवि/१६/हस्तदेय /२०१८ दि. १३ मार्च, २०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या तीनही जिल्हयाच्या आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
जनसंपर्क अधिकारी यांचे करीता